धाराशिव TODAY छत्रपती संभाजीनगर, ई

# छत्रपती शिवाजी महाविद्यालयात सायबर सुरक्षेवर कार्यशाळा


प्रतीक्षा पांगे

उमरगा, ता. २३ (बातमीदार) : वाढते सायबर गुन्हे आटोक्यात आणण्यासाठी सायबर सुरक्षेचे ज्ञान असणे प्रत्येकालाच आवश्यक झाले आहे. याचा विचार करून श्री छत्रपती शिवाजी कनिष्ठ महाविद्यालयात बुधवारी (ता. २१) सायबर सेक्युरिटी संदर्भात कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

आधुनिक माहिती तंत्रज्ञानाच्या युगामध्ये मानवी जीवन सुलभ झाले असले तरी त्यामुळे अडचणींमध्ये वाढ सुद्धा मोठ्या प्रमाणात झाली आहे. बँकिंग फ्रॉड, फसवणुक, मुलींना व महिलांना होणारा नाहक त्रास आदी बाबतीत जागरूकता निर्माण करण्यासाठी क्वीक हिल फाऊंडेशन व श्री छत्रपती शिवाजी कनिष्ठ महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने सायबर सुरक्षा या विषयावर विद्यार्थ्यांसाठी आयोजित कार्यशाळेत लातूरच्या राजर्षी शाहू महाविद्यालयाची प्रतीक्षा रमेश पांगे यांनी या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

स्नॅपचॅट, इंस्टाग्राम अशा अँपवर नकळतपणे होणाऱ्या चुका आणि त्यामुळे होणारा मनस्ताप, बँकिंग फ्रॉडमुळे होणारे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी त्यांनी विद्यार्थ्यांना अनेक युक्त्या सांगितल्या. समाज माध्यमाचा कमी, योग्य आणि सुरक्षित वापर या संदभनिही त्यांनी मार्गदर्शन केले. यावेळी उपस्थितांना सायबर सुरक्षेची शपथ देण्यात आली. या वेळी उपप्राचार्य डॉ. विलास इंगळे, उपप्राचार्य डॉ. पी. ए. पिटले, उपप्राचार्य प्रा. जी. एस. मोरे, पर्यवेक्षक प्रा. शैलेश महामुनी, प्रा. व्ही. व्ही. निचत, प्रा. बी. आर. लोकरे व विद्यार्थी उपस्थित होते. प्रा. सुरज सूर्यवंशी यांनी सुत्रसंचलन केले.